SPB
SHRI PISARNATH
BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर
छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, संचलित
कला विज्ञान व वाणिज्य निवासी महाविद्यालय
ता.सोयगांव जि.छत्रपती संभाजीनगर
मा.खा.रावसाहेब पाटील दानवे (अध्यक्ष) (माजी रेल्वे, कोळसा व खान केंद्रीय राज्यमंत्री)
मा.सौ.निर्मलाताई रावसाहेब पा.दानवे (सचिव) (छ.श्री.शिवाजी महाराज स्मारक समिती भोकरदन)
मा.आ.संतोष रावसाहेब पा.दानवे (भोकरदन जाफ्राबाद विधानसभा)
BA, Bcom, Bsc First Year विद्यार्थ्यांसाठी १५ जून २०२६ पासून प्रवेश सुरु
श्री.विजय देसाई : 9403251705

वर्ष : ०५ | अंक : ३२०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०१ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## चेंबूरमध्ये शाळेच्या बसवर झाड कोसळलं, अनेक मुलं जखमी ; एक मृत्युमुखी



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, मुंबई :** मुंबईच्या चेंबूर येथून मोठी बातमी समोर येत आहे. चेंबूरमध्ये शाळेच्या बसवर झाड कोसळल्याची घटना घडली आहे. संबंधित घटना ही चेंबूरमधील ११ नंबर रोडवर घडली आहे. घटना घडली तेव्हा बसमध्ये शाळकरी मुले होती. या दुर्घटनेत १० शाळकरी मुले गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. घटनेनंतर मुलांचे रेस्क्यू करुन गाडीतून बाहेर काढण्यात आलं. पण तरीही एक मुलगा गाडीतच अडकल्याची माहिती आहे. त्याला गाडीतून बाहेर काढण्याचे प्रयत्न शर्थीने सुरु आहेत. पण भलंमोठं वृक्ष बसवर कोसळल्याने बसची अवस्थादेखील वाईट झाली आहे. बसचं वरचं छत खालच्या दिशेला दबलं गेल्याने या मुलाच्या बचावकार्यात अडथला येत असल्याची माहिती मिळत आहे.

**एका विद्यार्थिनीचा मृत्यू**

प्राथमिक माहितीनुसार, या बसमध्ये एकूण १३ शाळकरी मुलं होती. एका नामांकीत शाळेची ही बस होती. बस चेंबूरच्या ११ नंबर रोडवरुन जात असताना अचानक भलं मोठं झाड हे या बसवर उन्मळून पडले. या घटनेत बसमधील १० शाळकरी मुले गंभीर जखमी झाले. यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. सर्व जखमी मुलांना जवळील खासगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. तर एक मुलगा हा बसमध्ये अडकला आहे. या मुलाला बाहेर काढण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. दरम्यान, या दुर्घटनेत एका विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे.

**अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांकडून बचावकार्य**

घटनेनंतर परिसरातील नागरिक घटनास्थळी मोठ्या संख्येने दाखल झाले. पोलिसांना या घटनेची तातडीने माहिती देण्यात आली. परिसरातील नागरिकांनी शक्य होईल तशी मदतीला सुरुवात केली. यानंतर अग्निशमक दलाचे कर्मचारी, महापालिकेचे कर्मचारी आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. सर्वांकडून मुलांना बाहेर काढण्याचं काम आधी करण्यात आलं. त्यानंतर त्यांना रुग्णालयात नेण्यात आलं. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांकडून प्रशासनावर संताप व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी आता कुणावर कारवाई होते? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

## बोरी येथे नशा करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या इंजेक्शनचा साठा जप्त; दोन जणांवर गुन्हा दाखल



**अक्षराज : जाफर शेख**

**दि.३०, बोरी (परभणी) :** नशा करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 'टरमाईन' इंजेक्शनची बेकायदेशीरपणे विक्री करणाऱ्या एका दुचाकीस्वाराला बोरी पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. त्याच्याकडून पोलिसांनी तब्बल ५ हजार रुपये किमतीचा इंजेक्शनचा साठा जप्त केला असून याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई सोमवार, २९ जून रोजी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास बोरी येथील दीक्षा भूमी समोर करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, बोरी पोलिसांचे पथक परिसरात गस्तीवर असताना, एक इसम विनापरवाना अंमली/गुंगीकारक औषध (इंजेक्शन) विक्री करत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने सापळा रचून दीक्षा भूमी समोरून एका दुचाकीस्वाराला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता, त्याच्याजवळ ५ हजार रुपये किमतीचा बेकायदेशीर 'टरमाईन' इंजेक्शनचा साठा मिळून आला. पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता, त्याने आपले नाव मोहम्मद शोएब कुरेशी मोहम्मद अनवर असे सांगितले. तसेच हे इंजेक्शन त्याने वसीम खान अक्तर खान याच्याकडून आणल्याची कबुली दिली.

**पोलिसांनी सर्व इंजेक्शनचा साठा जप्त केला असून, आरोपी मोहम्मद शोएब कुरेशी आणि वसीम खान अक्तर खान या दोघांवर बोरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.**

ही धडक कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे, पोलीस उपनिरीक्षक गायकवाड, पोलीस अंमलदार राजेश जटाळ, साळवणे, कांबळे, मोरे आणि फरीन रंगरेज यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. या कारवाईमुळे परिसरातील अवैध अंमली पदार्थ विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

## ऐन पावसाळ्याच्या तोंडावर ठाण्यात आज पुन्हा पाणीबाणी

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.३०, कळवा (ठाणे) :** यंदा जून महिना संपला तरी राज्यात कुठेच अपेक्षित असा पाऊस पडलेला नाही. त्यामुळे राज्यातील सर्वच धरणांमधील जलसाठा खूप कमी होत चालला आहे. अल-निनोमुळे वातावरणात झालेल्या बदलांमुळे यावर्षी पावसाळा सरासरी पेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. हा पाऊस इतका कमी पडतोय की, आता जुलै महिना उजाडला तरी अपेक्षित पाऊस पडताना दिसत नाही. यामुळे संभाव्य पाणी टंचाईचा धोका लक्षात घेता आता प्रशासन देखील सतर्क झालं आहे. ठाण्यात जलसंपदा विभागाच्या कळवा पाटबंधारे विभागाने पाण्याचे संवर्धन करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे ठाणे महापालिकेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ठाणे महानगरपालिकेस मे. स्टेम प्राधिकरणाकडून पाणीपुरवठा होतो आहे. संभाव्य पाणी टंचाईचे संकट विचारात घेता महापालिकेला जलसंपदा विभागाने महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. या निर्देशांनुसार आज बुधवारी १ जुलैरोजी सकाळी ९ ते गुरूवार २ जुलै सकाळी ९ वाजेपर्यंत असा २४ तासांचा पाणीपुरवठा बंद ठेवावा, असे स्टेम प्राधिकरणाने कळविले आहे. त्यानुसार आज बुधवारी सकाळी ९ वाजेपासून ते उद्या गुरूवारी ०२ जुलैच्या सकाळी ९ वाजेपर्यंत मे. स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. असं असलं तरी ठाणे महानगरपालिकेच्या स्वत:च्या पाणी पुरवठा योजनेचे नियोजन करुन टप्प्याटप्प्याने ठाणे शहरात एक वेळ पाणी पुरवठा सुरू ठेवण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. या भागांमध्ये सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत पाणी येणार नाही

# २ ते ४ जुलै तुफान पाऊस पडणार
## हवामान विभागाकडून महत्त्वाचा अलर्ट जारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, नागपूर :** अल निनोच्या प्रभावामुळे यंदा विदर्भासह राज्यातील अनेक भागांमध्ये जून महिन्यात अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाला. विदर्भात आतापर्यंत ४० ते ६० टक्क्यांपर्यंत पावसाची तूट नोंदविण्यात आली आहे. मान्सूनही यंदा साधारण आठ ते दहा दिवस उशिराने दाखल झाल्याने पावसाचे प्रमाण घटले. मात्र, बंगालच्या उपसागरात तयार होत असलेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे २ जुलैपासून विदर्भात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. काही जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे.

प्रादेशिक हवामान विभागाचे शास्त्रज्ञ प्रवीण कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, अल निनोचा प्रभाव सध्या स्पष्टपणे जाणवत आहे. सामान्यतः जून महिन्यात राज्यात मान्सून सक्रिय होऊन अनेक भागांत मुसळधार पाऊस पडतो. मात्र, यंदा अल निनोमुळे वातावरणातील बदलांमुळे पावसाचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी राहिले. विदर्भात अनेक ठिकाणी ५० ते ६० टक्के तर सरासरी ४० टक्के पावसाची तूट



नोंदविण्यात आली आहे.

**१२५ मिमी ते १४० मिमीपर्यंत पावसाची शक्यता**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरात कमी दाबाची प्रणाली तयार होत असून तिचा मार्ग विदर्भातून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे २ ते ४ जुलैदरम्यान संपूर्ण विदर्भात पावसाची तीव्रता वाढणार असून अनेक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. काही भागांत १२५ ते १४० मिमीपर्यंत पाऊस होण्याचाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**विदर्भातील चार जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट...**

या पार्श्वभूमीवर चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यांसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसासह विजांचा कडकडाट आणि वेगवान वाऱ्यांची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच पश्चिम विदर्भातील बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यांमध्येही चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**जून महिन्यात कमी पाऊस!**

हवामान विभागाच्या मते, यंदा मान्सूनचा प्रवास उशिराने सुरू झाल्यामुळे जून महिन्यातील पावसाची मोठी तूट निर्माण झाली. साधारणपणे १५ जूनपर्यंत विदर्भात मान्सून पोहोचतो, मात्र यंदा तो आठ ते दहा दिवस उशिरा दाखल झाला. त्यामुळे शेतीच्या कामांवरही परिणाम झाला असून पेरण्यांची गती मंदावली आहे.

**पावसाची तूट भरुन निघण्याची शक्यता...**

दरम्यान, पुढील काही दिवसांत होणाऱ्या पावसामुळे पावसाची तूट काही प्रमाणात भरून निघण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. मात्र, अल निनोचा प्रभाव कायम राहिल्यास संपूर्ण हंगामात मान्सून सामान्यपेक्षा कमी राहू शकतो, अशी शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे.

हवामान विभागाने शेतकऱ्यांना विशेष सतर्कतेचा इशारा दिला असून, विजांच्या कडकडाटाच्या वेळी शेतात काम टाळावे, सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा तसेच जनावरांची योग्य काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## बाल गुन्हेगारांची वयोमर्यादा १८ वरून १६ वर्षे करणार ?

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३०, मुंबई :** बाल गुन्हेगारांसाठीची वयोमर्यादा १८ वर्षांवरून १६ वर्षे करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. बालकांचा गुन्हेगारी आणि अमली पदार्थांच्या वितरणासाठी वापर करणाऱ्यांविरोधात अधिक कठोर कारवाई करता यावी, यासाठी कायद्यात आवश्यक बदल करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

जालना जिल्ह्यात अल्पवयीन मुलांचा गुन्हेगारीकडे वाढता कल याबाबत सदस्य अर्जुन खोतकर यांनी विधासभेत प्रश्न उपस्थित केला होता. सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनीही उपप्रश्न विचारत या प्रश्नाच्या चर्चेत सहभाग घेतला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, लातूर येथे घडलेली घटना वैयक्तिक स्वरूपाची असून ती कौटुंबिक वादातून घडली आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून, तपासात सहभाग निष्पन्न झालेल्या विधिसंघर्षित बालकांना बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात आले आहे. मात्र, विधिसंघर्षित बालकांना अटक न करता बालगृहात ठेवण्याच्या तरतुदीचा गैरफायदा काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक घेत आहेत. अशा प्रवृत्तीचे लोक बालकांकडून गुन्हे घडवून आणण्यासाठी त्यांचा वापर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, १६ वर्षांखालील बालकांकडूनही गंभीर गुन्हे होत असल्याचे निदर्शनात आले आहे.

या पार्श्वभूमीवर बालगुन्हेगारीच्या वाढत्या प्रवृत्तीचे वैज्ञानिक विश्लेषण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमण्यात येणार आहे. तसेच बालकांचा



वापर करणाऱ्या टोळ्या आणि संघटित गुन्हेगारीत सहभागी असलेल्या व्यक्तींवर संघटित गुन्हेगारीविषयक कठोर कलमे लावण्याबाबत आणि संबंधित कायदे अधिक प्रभावी करण्याबाबतही विचार करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या संदर्भातील एका उपप्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले की, बालगुन्हेगारी रोखण्यासाठी राज्यात विविध प्रतिबंधात्मक आणि पुनर्वसनात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. पोलीसांकडून शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी जनजागृती, समुपदेशन, सायबर सुरक्षा तसेच व्यसनमुक्तीबाबत मार्गदर्शन केले जाते. संवेदनशील भागांमध्ये नियमित गस्त आणि प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते.

राज्यमंत्री कदम म्हणाले की, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अंतर्गत सर्व पोलीस घटकांमध्ये विशेष बाल पथके स्थापन करण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून CARE (Counselling and Reformative Education) कार्यक्रम राबवून विधिसंघर्षित बालकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. तसेच, निरीक्षण गृहांमध्ये अशा बालकांच्या संरक्षण, शिक्षण, समुपदेशन, व्यक्तिमत्त्व विकास आणि पुनर्वसनावर विशेष भर दिला जात आहे.

## प्रकल्प सोयगांव अंतर्गत रिक्त अंगणवाडी मदतनीस पदांची भरती प्रक्रिया सुरू

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, सोयगाव :** एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सोयगांव तालुक्यातील (प्रकल्प सोयगांव ग्रामीण अंतर्गत) असलेल्या नांदा तांडा, देव्हारी, सावरखेडा, निंभोरा व तितूर या महसूली गावातील प्रत्येकी १ मदतनीस अशा एकूण ५ रिक्त असलेल्या मदतनीस पदांसाठी पदभरतीची कार्यवाही ३० जून पासून सुरू करण्यात येत आहे. सदरील भरती प्रक्रिया ही राज्य शासनाच्या शासन निर्णय दिनांक ०२ फेब्रुवारी २०२३ व दिनांक ३० जानेवारी २०२५ मधील नमूद अटी व शर्तीनुसार करण्यात येणार आहे.

मदतनीस पदासाठी शैक्षणिक पात्रता किमान १२ वी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. १२ वी पेक्षा जास्त शिक्षण पुर्ण केलेल्या अर्जदारास शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी २०२५ मध्ये नमूद परिशिष्ट अ नुसार अतिरिक्त गुण देण्यात येईल अतिरिक्त गुण मिळविण्यासाठी अर्जदाराने पदवी, पदव्युत्तर पदवी,




डी.एड., बी.एड. एम. एस.सी.आय.टी. अथवा शासनाने ठरविलेल्या समकक्ष संगणक परीक्षा प्रमाणपत्र उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. विधवा अथवा अनाथ, मागास प्रवर्गातील, सेविका/ मिनी सेविका/ मदतनीस पदाचे किमान २ वर्ष अनुभव असणाऱ्या अर्जदाराला अतिरिक्त गुण देण्यात येईल.

प्रकल्प कार्यालयाकडून पदभरती बाबत जाहिरात संबंधित महसूली गावाच्या ग्राम पंचायत कार्यालय, अंगणवाडी केंद्र, प्रकल्प कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर ३० जून रोजी प्रसिद्ध करून अर्ज स्विकारण्याचा कालावधी दिनांक ०१ जुलै ते १४ जुलै पर्यंत कार्यालयीन कामाचे एकूण १० दिवस (शासकीय सुटीचे दिवस वगळून) निश्चित केली आहे. तरी पद भरती असलेल्या महसुली गावातील पात्र महिला/ मुलींनी अर्ज रितसर अर्ज सादर करावे असे आवाहन केले आहे.

सदरील पदभरतीसाठी विहित अर्जाचा नमुना महसूली गावातील अंगणवाडी सेविका/ एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय सोयगाव येथे उपलब्ध असून अर्जदाराने परिपूर्ण भरलेला अर्ज एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय, कोर्टाच्या बाजूला सोयगांव येथे स्वतः उपस्थित राहून कार्यालयीन वेळेत सादर करावा. पोस्टाने इतर व्यक्तीच्या हस्ते अथवा इतर कोणत्याही मार्गाने अर्ज स्वीकारले जाणार नाही अशी माहिती बाल विकास प्रकल्प अधिकारी सुभद्रा सैवर तसेच कनिष्ठ सहायक युसूफ सय्यद यांनी दिली.

## संपादकीय

## दिवस पेरणीचे, माणुसकी जपणारे

सरकारी सुट्टीच्या दिवशी दक्षिण मुंबईत फिरण्याची मौज वेगळीच. फोर्टमध्ये डॉ. दादाभाई नौरोजी मार्गावरून खादी ग्रामोद्योग, सिद्धार्थ महाविद्यालय, मुंबई उच्च न्यायालय यांच्या कडेने मुंबई विद्यापीठापर्यंत पदपथावरून चालायचे ठरविले, तर ऊन असल्यास सावलीतून आणि पाऊस असल्यास कमीत कमी भिजत चालता येते. प्राचीन वास्तूवैभवाचे हे वैशिष्ट्य आहे. प्रत्येक प्राचीन इमारतीचे वरचे मजले, कमानी यांच्याखाली पदपथ आहेत. मुंबईत हे असे सुख किती काळ आणि कोणत्या वेळी सलगतेने मिळू शकते, हा मात्र प्रश्नच असतो.

हे सर्व प्रकर्षाने समोर येण्याचे कारण म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने पादचाऱ्यांच्या हक्काविषयी नुकतेच केलेले भाष्य. 'सुनिश्चित आणि योग्य देखभाल केलेल्या पदपथावरून चालण्याचे स्वातंत्र्य, हा मूलभूत अधिकार आहे आणि रस्ता तेथे पदपथ हवाच,' असे सर्वोच्च न्यायालयाने बजावले आहे. एका पाच वर्षाच्या मुलाच्या मृत्यूच्या निमित्ताने हे प्रकरण न्यायालयात आले होते. मुंबईत रस्ते बांधण्यास सुरुवात झाली, तेव्हापासून खरेतर अनेक रस्त्यांवर पदपथ आहेत. या पदपथांवरचे दगड पूर्वी अगदी ताशीव आणि दणकट असायचे. पेव्हर ब्लॉकची सद्दी सुरू झाल्यावर पदपथ उखडण्याचे प्रमाण वाढले. मुंबईत २०१६ मध्ये 'पादचारी प्रथम' असे एक धोरण आणण्यात आले होते.

मुंबईकरांच्या एकूण प्रवासापैकी ५१ टक्के प्रवास पायी केला जातो, असे त्यानिमित्तच्या सर्वेक्षणात आढळले होते; परंतु दर ५० ते १०० मीटरगणिक पदपथाचे पोत बदलतात, कधी पातळी बदलते, तर कधी पदपथच हरवतो. डोंबिवलीत रस्तेविकासाची उंची वाढून एक पदपथ इतका उंच झालेला दिसला की, इमारतीच्या तळमजल्याच्या खिडक्याच त्यावर उघडत होत्या. कुर्ला, ताडदेव आदी भागांत पुनर्विकसित इमारतींची प्रवेशद्वारे रुंद व उताराची झाली होती, त्यात पदपथ शोधावा लागत होता. मुंबई महापालिका मुख्यालयाशेजारीच भुयारी मेट्रोचे प्रवेशद्वार आणि कडेची भिंत यादरम्यान पदपथावर इतके पाणी साचू लागले की लोकांना रस्त्यावरच्या रहदारीतूनच वाट काढणे भाग पडते. एकूण काय, तर सलगपणे पदपथावर कुणीच चालू शकत नाही. मुंबई महापालिकेने मध्यंतरी २०० कोटी रुपये खर्चून पदपथ सुधारणांची योजना जाहीर केली होती; त्याचे फलित काही दिसले नाही.

पदपथांवर किंवा रस्त्यांवर पानाचे ठेले, चर्मोद्योग, टायरमध्ये हवा भरणारे, चहावाले असे मानवी सवयींच्या गरजेतून उद्योग उभे राहतात. काही भाजीवाले, फळवाले, ज्यूसवाले असतात. तर काही कपडेवाले, इलेक्ट्रॉनिक वस्तूवाले अशी भांडारेच मांडलेली असतात. यापैकी काहींच्या ठेल्यावर जुना परवाना क्रमांक, नवा परवाना क्रमांक अशा नोंदी दिसतात. म्हणजे त्यांना सहजपणे निष्कासित करणे कठीण. काही उद्योग हे गरजेपोटी अवतरले आहेत व त्यांच्या कामाचे स्वरूप हे रस्त्यावरचेच असते. किमान असे अपवाद वगळून तरी बाकीच्या फेरीवाल्यांना किफायतशीर मंडया, बाजारपेठांमध्ये सामावण्याचा विचार करता येईल.

विकासाच्या नियोजनात या मानवी चेहऱ्यालाही स्थान द्यावे लागते. अर्थात अभ्यास , नियोजन आणि निकषांपेक्षाही कुणाच्या वरदहस्ताने पदपथ, रस्ता व्यापला गेला आहे, त्याचे वजन किती, त्याने मोजले किती, हेच खरे चलनी नाणे ठरते. साहजिकच अतिक्रमणविरोधी पथके अशा सर्व वजनदार अडथळ्यांकडे काणाडोळा करतात. आर्थिक हितसंबंधांमुळे या पथकांवर हल्लेही होतात किंवा कित्येकदा तेही संशयाच्या भोवऱ्यात सापडतात. 'तू चाल पुढं तुला रं गड्या भीती कुनाची', हे काव्य प्रेरणादायी असले, तरी मुंबईच्या पदपथ आणि रस्त्यांवर मात्र पादचाऱ्यांना निर्धोकपणे कितपत चालता येईल, याबद्दल शंकाच आहे.

**– समीर कर्वे**

# झाडे वाचवायची की जीव? उत्तर आहे - दोन्ही!

आज चेंबूर येथे शाळेच्या बसवर झाड कोसळून एका निष्पाप विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आणि अनेक विद्यार्थी गंभीर जखमी झाले. ही घटना अत्यंत वेदनादायी आणि अस्वस्थ करणारी आहे. या घटनेने प्रत्येक संवेदनशील मनाला एकच प्रश्न पडतो या निष्पाप जीवांचा काय दोष होता? विकासाच्या नावाखाली आपण शहरे उभी केली; पण ती सुरक्षित बनविण्याची जबाबदारी मात्र आपण कितपत पार पाडली?

झाडे ही निसर्गाची अमूल्य देणगी आहेत. ती प्राणवायू देतात, तापमान नियंत्रित ठेवतात, पर्यावरणाचे संतुलन राखतात. त्यामुळे झाडे तोडणे हा उपाय निश्चितच नाही. परंतु, जी झाडे मानवी वस्तीत, शाळा, रुग्णालये, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणांच्या परिसरात उभी आहेत, त्यांची नियमित वैज्ञानिक तपासणी आणि व्यवस्थापन करणे ही स्थानिक प्रशासनाची तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे.

आज अनेक शहरांमध्ये झाडांच्या मुळांभोवती पूर्णपणे काँक्रीटीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे पावसाचे पाणी आणि हवा मुळांपर्यंत पोहोचत नाही. मुळे पुरेशी वाढू शकत नाहीत, त्यांची पकड कमकुवत होते आणि झाड आतून कमकुवत होत जाते. बाहेरून हिरवेगार दिसणारे झाड आतून पोकळ, कुजलेले किंवा बुरशीग्रस्त असू शकते. अशा झाडांचा धोका



सामान्य नागरिकांच्या लक्षात येत नाही.

यासाठी केवळ दृश्य पाहणी पुरेशी नाही. रेसिस्टोग्राफ, सोनिक टोमोग्राफी यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने झाडांचा आतील भाग तपासणे, प्रशिक्षित वृक्षतज्ज्ञांकडून नियमित ट्री रिस्क असेसमेंट करणे आणि धोक्याची पातळी निश्चित करणे अत्यावश्यक आहे. झाडाचा कल वाढणे, मुळांजवळ भेगा पडणे, खोडात पोकळी निर्माण होणे, मोठ्या फांद्या सुकणे किंवा बुरशी दिसणे ही धोक्याची स्पष्ट लक्षणे आहेत.

परंतु केवळ तपासणी करून थांबून चालणार नाही. मानवी वस्तीतील प्रत्येक मोठ्या झाडाचे शास्त्रीय पद्धतीने सर्वेक्षण करून भविष्यात ते कधीही कोसळू शकते, या शक्यतेचा विचार करून त्या-त्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा व्यवस्था उभारणे अत्यावश्यक आहे. ज्या ठिकाणी शाळा, रुग्णालये, बसथांबे, बाजारपेठा किंवा मोठी वर्दळ असते, तेथे धोकादायक झाडांना आधार व्यवस्था (Support System), स्टील केबलिंग, योग्य छाटणी, मुळांभोवती मोकळी जागा, संरक्षणात्मक बॅरिकेड्स किंवा इतर अभियांत्रिकी उपाययोजना तातडीने राबविण्यात याव्यात. आवश्यक असल्यास धोकादायक क्षेत्रांमध्ये वाहतूक व नागरिकांच्या हालचालींसाठी पर्यायी व्यवस्था निर्माण करावी. म्हणजे एखादे झाड कोसळले तरी ते थेट नागरिकांवर किंवा वाहनांवर पडून जीवितहानी होणार नाही.

अनेक विकसित देशांमध्ये मोठ्या झाडांचे नियमित ट्री रिस्क असेसमेंट केले जाते. धोकादायक झाडांना आधार देण्यासाठी स्टील केबल्स, सपोर्ट सिस्टीम, योग्य छाटणी अशा उपाययोजना केल्या जातात. अत्यंत धोकादायक ठरलेल्या झाडांबाबतच शेवटचा पर्याय म्हणून त्यांची नियमानुसार विल्हेवाट लावली जाते. त्यामुळे पर्यावरणही जपले जाते आणि मानवी जीवितही सुरक्षित राहते.

आपल्या शहरांमध्ये प्रत्येक महापालिकेने सर्व मोठ्या झाडांची डिजिटल नोंदणी, जीआयएस मॅपिंग, वार्षिक आरोग्य तपासणी आणि मान्सूनपूर्व विशेष सुरक्षा तपासणी बंधनकारक करणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, सार्वजनिक वाहतुकीचे मार्ग आणि गर्दीच्या परिसरातील झाडांना सर्वोच्च प्राधान्य देऊन त्यांच्यासाठी स्वतंत्र सुरक्षा आराखडा तयार केला पाहिजे.

प्रत्येक दुर्दैवी घटनेनंतर काही दिवस चर्चा होते, चौकशीचे आदेश दिले जातात आणि नंतर सर्व काही पूर्ववत होते. पण प्रत्येक अपघात आपल्याला एक धडा देऊन जातो. त्या धड्याचे धोरणात आणि कृतीत रूपांतर झाले, तरच त्या निष्पाप जीवांना खरी श्रद्धांजली ठरेल.

झाडे ही जीवनदायी आहेत; पण त्यांची योग्य देखभाल न झाल्यास ती नकळत मृत्यूचा सापळाही बनू शकतात. म्हणून प्रश्न झाडे ठेवायची की तोडायची? असा नाही. प्रश्न आहे प्रत्येक झाडाचे वैज्ञानिक व्यवस्थापन करून, ते भविष्यात कोसळल्यासही कोणतीही जीवितहानी होणार नाही अशी सुरक्षा व्यवस्था आपण निर्माण करू शकतो का? याचे उत्तर शोधणे ही आजची खरी गरज आहे.

निष्पाप जीवांचे रक्षण आणि पर्यावरणाचे संवर्धन हे परस्परविरोधी नाहीत. योग्य नियोजन, आधुनिक तंत्रज्ञान आणि दूरदृष्टी यांच्या आधारावर ही दोन्ही उद्दिष्टे सहज साध्य होऊ शकतात. आता भावना व्यक्त करण्यापेक्षा कृती करण्याची वेळ आली आहे.

**– पत्रकार विकास दळवी**
**दै.अक्षराज ठाणे प्रतिनिधी**

# कृषी : महाराष्ट्राच्या समृद्धीचा पाया

दरवर्षी १ जुलै हा दिवस महाराष्ट्रात 'कृषी दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका स्मृतिदिनापुरता मर्यादित नसून महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीचा, शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमांचा आणि शेतीच्या सर्वांगीण विकासाचा गौरव करणारा दिवस आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. महाराष्ट्राच्या कृषी विकासात त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते. त्यांच्या दूरदृष्टीमुळे शेतीच्या आधुनिकीकरणाला चालना मिळाली, सिंचनाचा विस्तार झाला, कृषी संशोधनाला प्रोत्साहन मिळाले आणि शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण धोरणे राबविण्यात आली. त्यामुळे कृषी दिन हा केवळ एका नेत्याला अभिवादन करण्याचा दिवस नसून शेती आणि शेतकरी यांच्या सन्मानाचा, त्यांच्या योगदानाची जाणीव करून देणारा आणि कृषी क्षेत्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी नव्या संकल्पांचा दिवस आहे.

भारतीय संस्कृतीचा पाया कृषीवर उभा आहे. हजारो वर्षांपासून शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून जीवनपद्धती, संस्कृती आणि अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू राहिली आहे. महाराष्ट्राची ओळखही समृद्ध कृषी परंपरेमुळे निर्माण झाली आहे. विदर्भातील कापूस, मराठवाड्यातील ज्वारी, पश्चिम महाराष्ट्रातील ऊस, कोकणातील आंबा, नाशिकचा द्राक्षबागायती पट्टा, उत्तर महाराष्ट्रातील कांदा, खानदेशातील केळी, सातारा-सांगलीतील हळद आणि विविध भागांतील डाळी, तेलबिया, फळे व भाजीपाला यामुळे महाराष्ट्राने कृषी क्षेत्रात स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. राज्यातील भौगोलिक विविधता आणि हवामानातील बदलांमुळे विविध प्रकारची पिके घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात वैविध्य निर्माण झाले असून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया शेतीने घातला आहे.

शेतकरी हा समाजाचा अन्नदाता आहे. तो उन्हाची तमा न बाळगता, पावसाची अनिश्चितता सहन करत, अनेक संकटांना सामोरे जात शेती करतो. त्याच्या कष्टामुळे प्रत्येक घरात अन्न पोहोचते. शेती हा केवळ व्यवसाय नसून निसर्गाशी असलेला जिव्हाळ्याचा संवाद आहे. बी पेरण्यापासून ते पीक घरात आणेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्याला संयम, परिश्रम आणि आशावादाची गरज असते. पाऊस वेळेवर पडेल का, रोगराई येईल का, बाजारभाव मिळेल का, उत्पादन खर्च भरून निघेल का, अशा अनेक प्रश्नांशी तो सतत झुंज देत असतो. तरीही तो निराश न होता पुन्हा नव्या हंगामाची तयारी करतो. म्हणूनच कृषी दिन हा शेतकऱ्यांच्या त्यागाचा आणि जिद्दीचा सन्मान करणारा दिवस आहे.


महाराष्ट्राच्या कृषी विकासामध्ये काळानुरूप मोठे बदल झाले आहेत. पारंपरिक शेतीपासून आधुनिक शेतीकडे वाटचाल करताना नवीन बियाणे, सुधारित अवजारे, ठिबक आणि तुषार सिंचन, यांत्रिकीकरण, कृषी संशोधन, हवामान आधारित सल्ला आणि माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला आहे. आज अनेक शेतकरी मोबाईलच्या माध्यमातून हवामानाचा अंदाज, बाजारभाव, पीक संरक्षण आणि कृषीविषयक मार्गदर्शन मिळवत आहेत. कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था आणि कृषी विज्ञान केंद्रे शेतकऱ्यांपर्यंत नवीन तंत्रज्ञान पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. उत्पादनवाढीसोबत गुणवत्तापूर्ण उत्पादनावर भर दिला जात असून निर्यातक्षम शेतीचा विस्तारही होत आहे.

हवामान बदल हे आज कृषी क्षेत्रासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. पावसाचे अनियमित स्वरूप, वाढते तापमान, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट आणि पूर यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. एका बाजूला पाण्याचा तुटवडा तर दुसऱ्या बाजूला अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान अशी दुहेरी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शाश्वत कृषी विकासासाठी हवामानाशी सुसंगत शेती पद्धती स्वीकारणे अत्यावश्यक झाले आहे. जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, पावसाच्या पाण्याचे संधारण, पीक विविधीकरण, मृदसंवर्धन आणि कमी पाण्यात येणाऱ्या पिकांचा अवलंब या उपाययोजना भविष्यातील शेतीसाठी अत्यंत आवश्यक ठरणार आहेत.

पाणी हे शेतीचे प्राण आहे. महाराष्ट्रातील अनेक भाग अजूनही पावसावर अवलंबून आहेत. त्यामुळे प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखून जलव्यवस्थापनाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. जलयुक्त शिवार, शेततळे, बंधारे, नाला खोलीकरण, ठिबक सिंचन आणि तुषार सिंचन यांसारख्या उपायांमुळे पाण्याचा कार्यक्षम वापर शक्य झाला आहे. अनेक गावांनी लोकसहभागातून जलसंधारणाची यशस्वी उदाहरणे निर्माण केली आहेत. पाण्याचे योग्य नियोजन केल्यास उत्पादन वाढते, खर्च कमी होतो आणि दुष्काळाच्या संकटावर मात करता येते.

मातीचे आरोग्य जपणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. रासायनिक खतांचा अतिरेक, जमिनीची धूप आणि सेंद्रिय पदार्थांचे कमी होत जाणारे प्रमाण यामुळे जमिनीची सुपीकता घटत आहे. त्यामुळे सेंद्रिय खतांचा वापर, हिरवळीची खते, गांडूळखत, जैवखते आणि संतुलित पोषण व्यवस्थापन यावर भर देणे गरजेचे आहे. मृदा परीक्षण करून आवश्यकतेनुसार खतांचा वापर केल्यास उत्पादनात वाढ होण्याबरोबरच खर्चातही बचत होते. माती ही केवळ उत्पादनाचे साधन नसून पुढील पिढ्यांसाठी जपून ठेवण्याची नैसर्गिक संपत्ती आहे.

आजच्या काळात नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती आणि शाश्वत शेती यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्राहकांमध्ये रसायनमुक्त अन्नधान्याची मागणी वाढत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी नैसर्गिक शेतीकडे वळत आहेत. स्थानिक संसाधनांचा वापर, कमी खर्च, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान आणि जमिनीचे आरोग्य जपण्यावर आधारित शेती भविष्यासाठी अधिक उपयुक्त ठरत आहे. अशा शेतीमुळे उत्पादनाचा दर्जा सुधारतो, पर्यावरणाचे संवर्धन होते आणि ग्राहकांनाही




सुरक्षित अन्न उपलब्ध होते.

कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाने मोठी क्रांती घडवून आणली आहे. ड्रोनद्वारे पीक निरीक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित रोगनिदान, उपग्रह तंत्रज्ञान, सेन्सर प्रणाली, स्वयंचलित सिंचन, डिजिटल बाजारपेठ आणि ई-व्यापारामुळे शेती अधिक वैज्ञानिक बनत आहे. अचूक शेतीमुळे पाणी, खते आणि कीटकनाशकांचा योग्य वापर करता येतो. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि उत्पादनाची गुणवत्ता वाढते. भविष्यात डिजिटल कृषी ही ग्रामीण विकासाची महत्त्वाची दिशा ठरणार आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी केवळ उत्पादन वाढविणे पुरेसे नाही, तर मूल्यवर्धन आणि बाजारपेठेशी थेट जोडणी आवश्यक आहे. कृषी प्रक्रिया उद्योग, शीतगृहे, साठवणूक सुविधा, निर्यात, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था आणि थेट ग्राहकांना विक्री या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळू शकतो. फळे, भाजीपाला, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधमाशी पालन, रेशीम उद्योग आणि कृषी पर्यटन यांसारखे पूरक व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यास मदत करतात. शेतीला उद्योगाची जोड मिळाल्यास रोजगारनिर्मिती आणि उत्पन्नवाढ दोन्ही शक्य होतात.

महिलांचे कृषी क्षेत्रातील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. पेरणी, निंदणी, कापणी, पशुपालन, बीज संवर्धन आणि कृषी प्रक्रिया यामध्ये महिलांचा मोठा सहभाग असतो. अनेक महिला बचतगट कृषीपूरक उद्योग यशस्वीपणे चालवत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी महिलांना प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य, बाजारपेठ आणि आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता वाढविणे आवश्यक आहे. महिला सशक्त झाल्यास कृषी विकासालाही नवी गती मिळते.

युवा पिढीने शेतीकडे आधुनिक व्यवसाय म्हणून पाहण्याची गरज आहे. कृषी पदवीधर, कृषी उद्योजक आणि स्टार्टअपच्या माध्यमातून अनेक तरुण शेतीत नवकल्पना आणत आहेत. स्मार्ट शेती, कृषी सल्लागार सेवा, अॅग्री-टेक, जैवउत्पादने, प्रक्रिया उद्योग आणि ई-कॉमर्सच्या माध्यमातून शेतीला नवे आयाम मिळत आहेत. शिक्षित तरुणांनी ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती करून कृषी क्षेत्र अधिक स्पर्धात्मक आणि सक्षम बनविण्याची आवश्यकता आहे.

कृषी शिक्षण आणि संशोधन हे कृषी विकासाचे आधारस्तंभ आहेत. बदलत्या हवामानानुसार नवीन वाण विकसित करणे, रोगप्रतिबंधक तंत्रज्ञान, कमी खर्चातील शेती, जैवविविधतेचे संवर्धन आणि आधुनिक कृषी व्यवस्थापन यासाठी संशोधन संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. संशोधनातून विकसित होणारे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचले तर कृषी क्षेत्र अधिक सक्षम होईल.

आज कृषी क्षेत्रासमोर अनेक समस्या आहेत. उत्पादन खर्च वाढत आहे, बाजारभावात चढ-उतार होत आहेत, नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढले आहे, शेतीचे क्षेत्र लहान होत आहे आणि ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढत आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी दीर्घकालीन कृषी धोरण, शाश्वत जलव्यवस्थापन, पिकांचे योग्य नियोजन, विमा संरक्षण, कृषी प्रक्रिया उद्योग आणि शेतकरी-केंद्रित धोरणे आवश्यक आहेत. शासन, संशोधन संस्था, स्वयंसेवी संघटना आणि शेतकरी यांनी समन्वयाने कार्य केल्यास कृषी क्षेत्र अधिक सक्षम होऊ शकते.

'जय जवान, जय किसान' हा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. देशाची अन्नसुरक्षा, अर्थव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य यांचा पाया शेतीवरच अवलंबून आहे. कृषी हा केवळ अर्थकारणाचा विषय नसून पर्यावरण, संस्कृती, रोजगार, पोषण आणि ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाचा योग्य सन्मान, त्यांच्या उत्पादनाला न्याय्य मोबदला आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यास भारत जगातील अग्रगण्य कृषी राष्ट्र म्हणून अधिक सक्षमपणे उभा राहू शकतो.

कृषी दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रमांचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा आणि नव्या संकल्पांचा दिवस आहे. शेतकरी समृद्ध झाला तर गाव समृद्ध होईल, गाव समृद्ध झाले तर राज्य प्रगत होईल आणि राज्य प्रगत झाले तर देशाची प्रगती अधिक वेगाने होईल. म्हणूनच कृषी दिनाच्या निमित्ताने जल, जमीन, जंगल आणि जैवविविधतेचे संवर्धन करत आधुनिक विज्ञान आणि पारंपरिक ज्ञान यांचा समन्वय साधणारी शाश्वत शेती उभारण्याचा निर्धार करणे ही काळाची गरज आहे. शेतकऱ्यांच्या घामाच्या प्रत्येक थेंबाचा सन्मान, कृषी क्षेत्रातील नवसंशोधनाचा स्वीकार आणि निसर्गाशी सुसंगत विकासाचा मार्ग स्वीकारणे, हीच महाराष्ट्राच्या कृषी दिनाची खरी प्रेरणा ठरेल. कृषी हा केवळ व्यवसाय नाही, तर संस्कृती, सभ्यता आणि जीवनाचा आधार आहे. त्यामुळे समृद्ध शेतकरी, समृद्ध महाराष्ट्र आणि समृद्ध भारत हे स्वप्न साकार करण्यासाठी कृषी दिन हा प्रत्येक नागरिकासाठी प्रेरणा, कृतज्ञता आणि जबाबदारीची जाणीव करून देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## गावे पाणीदार झाली तरच जनजीवन समृद्ध - सुजित झावरे पाटील
### आम्ही टाकळीकरांच्या जलसंधारण कामाची पाहणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामविकासाच्या चळवळीत जलसंधारण कामाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. गावे पाणीदार झाली, तरच तेथील लोकांचे जीवनमान समृद्ध होऊ शकते. म्हणूनच टाकळी ढोकेश्वरमध्ये आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून गावात विविध प्रकल्प उभारताना लोकसहभागाच्या बळावर जलसंधारणाच्या कामांना सर्वोतोपरी मदत केली जाईल असे आश्वासन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष तथा शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांनी दिले.

आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून टाकळी ढोकेश्वरमध्ये जलसंधारण चळवळीचा दुसरा टप्पा पूर्ण करण्यात आला. त्या कामांची रविवारी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी पहाणी केली. यावेळी ते बोलत होते.

या जलसंधारण कामात आम्ही टाकळीकर सोबत ग्रामपंचायत व इतर विविध संस्थांनी व सर्व ग्रामस्थांनी महत्वपूर्ण योगदान दिले. दरम्यान सुजित झावरे पाटील यांनी या जलसंधारण कामाची पाहणी करत लोकसहभागातून होत असलेल्या या अभियानाचे कौतुक करताना आम्ही टाकळीकरच्या प्रत्येक प्रकल्पास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब बांडे, सचिव जेष्ठ पत्रकार चाँद शेख, डॉ.भाऊसाहेब खिलारी, संतोष सोनवणे, संकेत झावरे, अंकुश पायमोडे,मळीभाऊ रांधवण, अमोल साळवे, के.बी.बांडे, बबलू खिलारी, बबलू झावरे, लहू जाधव, विक्रम झावरे आदिंसह युवक, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## टाकळी ढोकेश्वर आरोग्य केंद्राचे नूतनीकरण करा - आ.दाते यांची विधानसभेत मागणी




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** पावसाळी अधिवेशनात सन २०२६-२७ च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सहभागी होत आमदार काशिनाथ दाते यांनी शेतकरी, पशुपालक आणि ग्रामीण आरोग्य व्यवस्थेशी संबंधित विविध महत्त्वाचे प्रश्न विधानसभेत उपस्थित केले. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, तसेच ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा सक्षम करण्यासाठी टाकळी ढोकेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्राचे तातडीने नूतनीकरण करावे, अशी ठाम मागणी त्यांनी शासनाकडे केली. सार्वजनिक आरोग्य विभागावरील चर्चेत बोलताना आमदार दाते यांनी टाकळी ढोकेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्राची सध्याची अवस्था सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. सुमारे २० ते २५ वर्षांपूर्वी उभारण्यात आलेली ही इमारत जीर्ण झाली असून अनेक मूलभूत सुविधांचा अभाव आहे. अपुऱ्या जागा, दुरवस्था आणि आवश्यक वैद्यकीय सुविधांच्या कमतरतेमुळे रुग्णांसह आरोग्य कर्मचाऱ्यांनाही अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. या आरोग्य केंद्रातून टाकळी ढोकेश्वरसह परिसरातील अनेक गावांतील नागरिकांना सेवा दिली जाते. त्यामुळे या इमारतीचे तातडीने नूतनीकरण करून आधुनिक वैद्यकीय सुविधा, आवश्यक मनुष्यबळ आणि अद्ययावत उपकरणे उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींचाही मुद्दा उपस्थित करत, नैसर्गिक संकटे, वाढता उत्पादन खर्च आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकरी अडचणीत सापडला असल्याने राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्याचा निर्णय शासनाने घ्यावा, अशी जोरदार मागणी केली. ग्रामीण विकास, आरोग्य आणि शेती क्षेत्रातील प्रश्नांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा ही त्यांनी व्यक्त केली.

## महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात शाळा प्रवेशोत्सव उत्साहात




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३०, खापरखेडा (नागपूर) :** स्थानिक महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी वेकोलि सिल्लेवाडा व विद्युत निर्मिती केंद्र खापरखेडा यांच्या संयुक्त सौजन्याने प्राप्त झालेल्या सोलर पॅनलचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुधीर केदार होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता विवेक रोकडे, क्षेत्रीय व्यवस्थापक (ह्युमन रिसोर्स) बिनेजकुमार, विकोलिचे उपक्षेत्रीय व्यवस्थापक पंकज सिंग, शाळा समिती सदस्य मुरलीधर निंबाळकर तसेच पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष कैलास बर्वे उपस्थित होते.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, पर्यवेक्षिका श्यामली चाणीकर ,पर्यवेक्षक विजय टेकाडे आणि शिक्षक प्रतिनिधी अभय पुल्लिवार यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तसेच नवागत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करून त्यांना नियमित शिक्षण, गुणवत्ता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. सोलर पॅनलमुळे शाळेला स्वच्छ व अक्षय ऊर्जेचा लाभ होणार असून वीज बचतीसह पर्यावरणसंरक्षणालाही हातभार लागणार असल्याचे मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले.कार्यक्रमात पालक, ग्रामस्थ, शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी धैर्यशील सुटे यांच्या चमुने ऐरोबिक्स व लेझीम कवायत सादर केले. संगीत शिक्षक नानोटी यांनी शिक्षण हक्क गीत सादर केले. शाळेचे पर्यवेक्षक माहूरतळे यांचे हस्तलिखित पथनाट्य 'मला बी शाळेला जाऊ द्या की रं' सादर करण्यात आले, यात नलिनी काकडे, मोक्षा भोंडे, इंदिरा भड यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षक संजीव शिंदे यांनी व मिलिंद डोंगर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# लासलगावात चोरांचा हैदोस

## दिगंबर जैन मंदिरासह मोबाईल दुकान व बँकेत धाडसी चोरी; पोलीस 'अ‍ॅक्शन मोड'वर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३०, लासलगाव (नाशिक) :** लासलगाव येथील मध्यवर्ती भागात असलेल्या सर्वे नंबर ९३ मधील ग्रामपंचायत जवळील क्रिकेट ग्राउंड शेजारी असलेल्या दिगंबर जैन स्थानक मंदिरात रात्रीच्या सुमारास ४ ते ५ जणांच्या टोळीने खिडकी फोडून आत प्रवेश केला. चोरांनी मंदिरातील कपाटांची तोडफोड करत देवाचे सुमारे अडीच किलो वजनाचे चांदीचे टोप व इतर मौल्यवान साहित्य चोरून नेले. एवढेच नव्हे तर, चोरांनी जवळच असलेल्या पंजाब नॅशनल बँक आणि बस स्टँड जवळील कॉम्प्लेक्समधील 'जय बाबाजी मोबाईल सेंटर' येथेही डल्ला मारत मोबाईल लंपास केले. एकाच रात्री झालेल्या या तीन धाडसी चोऱ्यांमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

**खिडकी तोडून मंदिरात प्रवेश, वस्तूंची नासधूस**

मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. दरेकर यांच्या घराजवळ असलेल्या या दिगंबर जैन मंदिरात रात्री २ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. चोरांनी मंदिराच्या खिडकीचे गज/काच फोडून आत प्रवेश केला.




मंदिरातील कपाट फोडून आतील सामान अस्ताव्यस्त फेकून दिले आणि देवाचे अंदाजे २.५ किलो चांदीचे टोप व साहित्य जबरी चोरी करून पळ काढला.

**बँक आणि मोबाईल दुकानही लक्ष्य**

मंदिरात चोरी केल्यानंतर या टोळीने आपला मोर्चा जवळच असलेल्या पंजाब नॅशनल बँक आणि बस स्टँड परिसरातील 'जय बाबाजी मोबाईल सेंटर'कडे वळवला. मोबाईल दुकानातून महागडे मोबाईल फोन चोरीला गेल्याचे समोर आले आहे.पोलीस 'अ‍ॅक्शन मोड'वर, श्वानपथक पाचारणया घटनेची माहिती मिळताच लासलगाव पोलीस स्टेशनचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. गुन्ह्याचा वेगाने छडा लावण्यासाठी पोलिसांनी तात्काळफिंगर प्रिंट्स (ठसे तज्ज्ञ)आणिडॉग स्कॉड (श्वानपथक)च्या टीमला पाचारण केले असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजही तपासले जात आहेत. लासलगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षकदीपक पाटीलयांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआयसाळुंखेवगोसावीपुढील तपास अत्यंत वेगाने करत आहेत.

**नागरिकांची मागणी : क्रिकेट ग्राउंड परिसरात रात्री 'नो एन्ट्री' करा!**

या घटनेनंतर सर्वे नंबर ९३ मधील स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे व संतापाचे वातावरण आहे. क्रिकेट ग्राउंड जवळील मोकळ्या जागेत रात्री उशिरापर्यंत समाजकंटक आणि संशयित लोकांचा वावर असतो. त्यामुळे रात्री १० नंतर या परिसरात कोणासही थांबण्यास परवानगी देऊ नये आणि पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी जोरदार मागणी येथील रहिवाशांनी केली आहे.

## लासलगावात भारतीय डाक विभागातर्फे दोन दिवसीय मेगा आधार सेवा महाशिबिर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३०, विंचूर (नाशिक) :** लासलगाव व परिसरातील नागरिकांना आधार कार्डाशी संबंधित विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय डाक विभागाच्या चांदवड उपविभागातर्फे लासलगाव येथे दोन दिवसीय 'मेगा आधार सेवा महाशिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर २९ व ३० जून २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ या वेळेत भगरी बाबा मंदिर, लासलगाव-विंचूर रोड येथे पार पडले आहे.

**विविध सेवा आणि शासकीय शुल्क खालीलप्रमाणे :**

नागरिकांच्या सुविधेसाठी शिबिरामध्ये विविध सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या असून त्यासाठी खालीलप्रमाणे शासकीय शुल्क आकारले जात आहे:

**नवीन आधार नोंदणी :** मोफत

**डेमोग्राफिक अपडेट (नाव, पत्ता, जन्मतारीख, मोबाईल आणि ई-मेल दुरुस्ती) :** ₹ ७५/-

**बायोमेट्रिक अपडेट (फोटो, बोटांचे ठसे व डोळ्यांच्या बुबुळांची नोंद) :** ₹ १२५/-



**टपाल विभागाच्या कल्याणकारी योजनांचे सादरीकरण...**

आधार सेवांसोबतच भारतीय डाक विभागातर्फे राबविल्या जाणाऱ्या विविध महत्त्वपूर्ण योजनांची माहिती या शिबिरात नागरिकांना दिली जात आहे. यामध्ये प्रामुख्याने :

- पोस्टल लाईफ इन्शुरन्स (PLI) व ग्रामीण टपाल जीवन विमा (RPLI)
- सुकन्या समृद्धी खाते
- सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी (PPF)
- ज्येष्ठ नागरिक बचत खाते आणि आवर्ती खाते (RD)

सर्व नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डाक निरीक्षक पी. एन. दुसाने यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**मान्यवरांच्या हस्ते उत्साहात उद्घाटन :** सदर महाशिबीराचे उद्घाटन लासलगाव मार्केट कमिटीच्या सभापती सुवर्णा जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शुभेच्छा देताना त्यांनी, लासलगाव डाक विभागाचे हे उपक्रम स्वागतार्ह असून सर्व नागरिकांनी या महाशिबिराचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा, असे आवाहन केले.

**उपस्थित मान्यवर :** या प्रसंगी लासलगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच योगिता पाटील, लासलगाव मार्केट कमिटीचे सचिव वाढवणे साहेब, रंजना शिंदे, अनिता खैरे, मालेगाव विभागाचे डाक अधीक्षक एस. व्ही. थळकर, चांदवड उपविभागाचे डाक निरीक्षक पी. एन. दुसाने, लासलगाव पोस्ट ऑफिसचे पोस्ट मास्तर आर. एन. वानखेडे उपस्थित होते.

तसेच चांदवड उपविभागाचे डाक साहाय्यक अमोल पगार, मेल ओव्हरसियर अनिल सोनवणे व बळीराम घोटेकर, नितीन वाघळे, संतोष लोहारकर, प्रकाश लाड, प्रदीप भांडवलकर यांच्यासह जी. डी. कर्मचारी आणि परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मंदिर बांधकामासाठी आणलेल्या विटांची वाताहात



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, उंब्रज (सातारा) :** कळंत्रेवाडी, ता. कराड येथील पाटण-पंढरपूर राज्य मार्गालगत बांधण्यात आलेल्या गणपती मंदिरासाठी आणलेल्या विटांची मोठ्या प्रमाणात नासाडी झाल्याचे समोर आले आहे. बांधकामासाठी मोठ्या खर्चाने आणून ठेवलेल्या विटांची योग्य प्रकारे देखभाल व सुरक्षित साठवण न केल्यामुळे रस्ता रुंदीकरणाच्या कामादरम्यान त्या विटा अक्षरशः चिरडल्या गेल्या असून त्यांचा मोठा ढिगारा आजही मंदिरासमोर पडून आहे.गणपती मंदिराचे बांधकाम गेल्या काही काळापासून अपूर्ण अवस्थेत असून, त्यासाठी आणलेल्या विटा उघड्यावरच ठेवण्यात आल्या होत्या. या विटांची वेळेवर व्यवस्था करण्यात आली नाही किंवा सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आल्या नाहीत.

परिणामी, राज्य मार्गाच्या रुंदीकरणाच्या कामात यंत्रसामग्री व वाहनांच्या वर्दळीमुळे विटांची पूर्णपणे वाताहात झाली आहे. छायाचित्रातही मोठ्या प्रमाणावर फुटलेल्या व विखुरलेल्या विटांचा ढिग स्पष्टपणे दिसून येत आहे.या निष्काळजीपणामुळे मंदिराच्या बांधकामासाठी झालेल्या खर्चाचे मोठे नुकसान झाले असून, याची जबाबदारी नेमकी कोणाची?असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. मंदिर हे गावाच्या श्रद्धेचे केंद्र असताना अशा प्रकारे बांधकाम साहित्याची नासाडी होणे ही अत्यंत खेदजनक बाब असल्याची भावना व्यक्त होत आहे. मंदिराच्या बांधकामातील साहित्याची अशी नासाडी होणे हे केवळ आर्थिक नुकसान नसून भाविकांच्या श्रद्धेलाही धक्का देणारे आहे. त्यामुळे या प्रकरणात जबाबदारी निश्चित करून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे ग्रामस्थांचे मत आहे.

## पशुपालकांनी चारा बियाण्यांसाठी संपर्क साधावा : डॉ. दिसले




**अक्षराज : प्रतिनिधी**


**दि.३०, उंब्रज (सातारा) :** उंब्रज, ता.कराड येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुपालकांसाठी चारा वर्गीय बियाणे उपलब्ध झाले असून, परिसरातील शेतकरी व पशुपालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पशुधन विकास अधिकारी डॉ. किरण दिसले यांनी केले आहे.

डॉ. दिसले यांनी दिलेल्या माहितीनुसार, पशुवैद्यकीय दवाखाना (श्रेणी-१), उंब्रज येथे जनावरांसाठी सकस व पौष्टिक हिरवा चारा उपलब्ध व्हावा या उद्देशाने मका, कडवळ व न्यूट्री फीड या चारा पिकांचे बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहे.या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकरी व पशुपालकांनी चालू सातबारा, आधार कार्ड ही आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत. बियाण्यांचे वाटप प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर करण्यात येणार असल्याने इच्छुकांनी विलंब न करता दवाखान्याशी संपर्क साधावा, असेही डॉ. किरण दिसले यांनी स्पष्ट केले. हिरव्या चाऱ्याचे उत्पादन वाढल्यास जनावरांना वर्षभर सकस खाद्य उपलब्ध होण्यास मदत होईल, दूध उत्पादनात वाढ होईल तसेच पशुपालन व्यवसाय अधिक सक्षम होईल. त्यामुळे परिसरातील सर्व शेतकरी व पशुपालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. किरण दिसले यांनी केले आहे.

## आरोग्य यंत्रणेचा हलगर्जीपणा; विषारी सापाच्या दंशाने सहा वर्षीय मुलाचा मृत्यू

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, जिवती (चंद्रपूर) :** जिवती तालुक्यातील लचमागुडा येथे विषारी सर्पदंश झालेल्या सहा वर्षीय समीर आत्रामचा उपचारासाठी वेळेवर रुग्णवाहिका न मिळाल्याने मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी रस्ता नसल्याने गरोदर महिलेचा मृत्यू झाल्यानंतर आता पुन्हा एका बालकाचा जीव गेल्याने आरोग्य व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्राथमिक उपचार, रेफरल प्रक्रिया, आणि रुग्णवाहिकेच्या उपलब्धतेबाबत परस्परविरोधी दावे समोर आले असून, गावकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. काही दिवसांपूर्वी गावात रस्ता नसल्याने गरोदर महिलेचा मृत्यू झाला होता, रस्ता नसल्याने महिलेच्या घरी रुग्णवाहिका पोहचू शकली नव्हती, या घटनेला १५ दिवस उलटले नसताना आज २९ जून रोजी ६ वर्षीय मुलाचा रुग्णवाहिका न मिळाल्याने खाजगी वाहनात त्याला रुग्णालयात नेण्यात आले मात्र, रुग्णालयात पोहोचल्यावर मुलाला मृत घोषित करण्यात आले. या घटनेमुळे पुन्हा एकदा आरोग्य विभागाचा गलथान कारभार उघडकीस आला आहे.



जिवती तालुक्यातील लचमागुडा मधील ६ वर्षीय समीर मारोती आत्राम ला पहाटे ४ वाजताच्या सुमारास विषारी साप चावला. यावेळी मुलाला अचानक हगवण लागल्याने आजीने त्याला शौचासाठी नेले. काही वेळात आजीच्या अंथरूणावरुन विषारी साप गेला. मुलाला झोपेत विषारी साप चावल्याचे समजताच आई-वडिलांनी मुलाला ऑटोत पाटण मधील प्राथमिक आरोग्य उपचार केंद्रात नेले. त्याठिकाणी प्रथमोपचार करण्यात आले. परंतू तिथे रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने बराच वेळ निघून गेला. डॉक्टरांनी रेफर केले मात्र, आई-वडिलांकडे वाहनाची व्यवस्था नव्हती, उपचार केंद्रातही रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने आत्राम कुटुंबाने मुलाला रुग्णालयात नेण्यासाठी वाहनांची जुळवाजुळव केली. चारचाकी वाहनाची व्यवस्था झाल्यावर आत्राम कुटुंब गडचांदूर च्या दिशेने निघाले मात्र, रुग्णालयात नेल्यावर डॉक्टरांनी समीर ला मृत घोषित केले. रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध झाली नसल्याने समीर ला वेळेवर उपचार न मिळाल्याने त्याचा मृत्यू झाला. मुलाला गडचांदूर ग्रामीण रुग्णालयात रेफर करण्यात आले पण रेफर चिठ्ठीवर साप चावल्याचा उल्लेख नव्हता अशी माहिती आहे. समीरच्या या मृत्यूने लचमागुडा या गावावर शोककळा पसरली आहे, तर दुसरीकडे जिवती तालुक्यातील आरोग्य यंत्रणेच्या चिंधड्या उडाल्याचे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करुनही दुर्गम भागात वेळेवर एक रुग्णवाहिका उपलब्ध होऊ शकत नसेल, तर या डिजीटल युगातल्या आरोग्य सेवांचा काय फायदा? असा संतप्त सवाल आतानागरिक विचारत आहे. या घटनेनंतर तरी प्रशासनाला जाग येईल का? आणि जिवती तालुक्तील आरोग्य व्यवस्थेत सुधारणा होईल का? हे पाहणे महत्वाचे ठरेल.

# महाबळेश्वरमध्ये दिवाणी व फौजदारी न्यायालय सुसज्ज इमारतीत सुरू

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.३०, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर नगरपालिकेच्या वतीने नूतनीकरण करण्यात आलेल्या स्वतंत्र व सुसज्ज इमारतीतून मंगळवार, दि.३० जूनपासून महाबळेश्वर दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे कामकाज अधिकृतपणे सुरू झाले. मान्यवरांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे जिल्हा न्यायाधीश ए.एस.वाघमारे न्यायमूर्ती यु.एस.ईवरे महाबळेश्वर न्यायाधीश तसेच श्री.काळे कोर्ट मॅनेजर, श्री.देसाई जिल्हा रजिस्ट्रार, महाबळेश्वर तालुका वकिल संघाचे अध्यक्ष विजयकुमार दस्तुरे व इतर मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. न्यायमूर्ती यु.एस. ईवरे महाबळेश्वर उपस्थितीत नव्या इमारतीत न्यायालयीन कामकाजास प्रारंभ झाला.




यापूर्वी न्यायालयाचे कामकाज तहसील कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील अग्निशामक दलाच्या प्रशिक्षण केंद्रात तात्पुरत्या स्वरूपात सुरू होते. मात्र, अपुऱ्या जागेमुळे वकील, पक्षकार तसेच न्यायालयीन कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते.

या पार्श्वभूमीवर अनेक वर्षांपासून वापराविना असलेली पोलीस ग्राउंडजवळील जुन्या आठवडे बाजाराची इमारत न्यायालयासाठी भाडेतत्त्वावर देण्याचा निर्णय महाबळेश्वर नगरपालिकेने घेतला.

या नव्याने सुसज्ज करण्यात आलेल्या न्यायालयीन इमारतीचे लोकार्पण महाराष्ट्र दिनी नगराध्यक्ष सुनील शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले होते. सर्व आवश्यक सुविधांनी सुसज्ज असलेल्या या स्वतंत्र इमारतीमुळे न्यायालयीन कामकाज अधिक सुलभ होणार असून, वकील आणि पक्षकारांना अपुऱ्या जागेच्या समस्येतून मोठा दिलासा मिळणार आहे. आजपासून सुरू होणाऱ्या या नव्या पर्वाबद्दल महाबळेश्वर तालुका वकील संघ तसेच नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या प्रसंगी अँड प्रभाकर हिरवे, ॲड.रेणूका ओंबळे, अँड भारती जगताप, ॲड लता मांजलकर, अँड.संजय जंगम, अँड शीपाद ढाणक, अँड.राजेश शिंदे, अँड वैशाली लोखंडे, ॲड विश्वास सांळुंखे, कल्याणी शेटे, अँड.अमान बागवान, ॲड कदम, अँड शेख तसेच महाबळेश्वर कोर्ट सहाय्यक अधिक्षक जगताप तसेच कोर्ट कर्मचारी वर्ग व पिटिशन राईटर बाळासाहेब आखाडे इत्यादी उपस्थित होते.

# वाकी नदीत कोळंबी मिळण्याचा दुर्मिळ योग

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.३०, गुहागर (रत्नागिरी) :** महाराष्ट्रात सर्वत्र पावसाने उशीरा हजेरी लावली असली तरी कोकणात मात्र पावसाने जोर धरला आहे. येथील नद्या-नाले भरून वाहत आहेत. त्यामुळे कोकणात अनेक ठिकाणी चढणीचे मासे, खेकडे पकडण्यात कोकणकर मग्न झालेले पाहायला मिळत आहे,

दरम्यानच्या काळात कामानिमित्त मुंबई - पुणे येथे राहणारे कोकणकर आपल्या गावी येऊन निसर्ग कुशीत मिळणाऱ्या या अनमोल मेव्याचा आस्वाद घेतात.असाच दुर्मिळ योग गुहागर तालुक्यातील वाकी गावच्या ग्रामस्थांना अनुभवता आला. मंगळवार, दिनांक ३० जून २०२६ रोजी वाकी गावातील समिर धाकु काताळे आज सकाळी पारंपरिक पद्धतीने जाळे घेऊन नदिवर चढणीचे मासे पकडण्यासाठी गेले असता सदर जाळ्यात जवळ जवळ २ ते ३ किलो कोळंबी (चिंगळे) मिळून आले आहेत. कोळंबी (चिंगळे) मिळण्याचा वाकी गावात हा पहिलाच योग असल्याने वाकी गावात याबाबत मोठी कुतुलता निर्माण झाली आहे.



गुहागर तालुक्यातील निसर्ग कुशीत वसलेले वाकी गाव आणि या गावात झुळझुळ वाहणारी वाकि नदी, या नदीची ख्याती म्हणजे २५-३० वर्षांपूर्वी हि नदी बारमाही वाहणारी म्हणून प्रसिद्धीस होती परंतु बदलते नैसर्गिक चक्र, काळ बदलला तसे पुराच्या पाण्यातून वाहत येणारा प्लास्टिक कचरा, पाळा-पाचोळा हा वाहणाऱ्या नदीत साचून राहत असल्याने नदीचे पात्र,खोली कमी झाली परिणामी बारमाही वाहणारी नदी आज कोरडी पडत चालली आहे तर दुसरीकडे कित्येक वर्षांनंतर पहिल्यांदाच कोळंबी (चिंगळे) हा मत्स्य प्रकार वाकी नदित पाहायला मिळाल्याने गावकऱ्यांना एक प्रकारचे रोजगार निर्मितीचे संकेत मिळाल्याने गावात आनंदाचे वातावरण आहे. भविष्यात वाकी नदितून चांगल्या प्रकारे मासेमारी रोजगार निर्मिती उपलब्ध होऊ शकतो असा ग्रामस्थांनी विश्वास व्यक्त केला आहे. प्रतिवर्षी ग्रामस्थांनी श्रमदान करून बंधारे बांधून पाणी अडवा पाणी जिरवा ही मोहीम चालू केली असली तरी फेब्रुवारी - मार्च नंतर दरवर्षी पाण्याचा तुटवडा निर्माण होतो. ग्रामीण वस्तीत राहणारी येथील शेतकरी चातक पक्षा प्रमाणे पावसाची वाट पहात असतात,एकदा का पाऊस पडला नद्या नाले भरले, कि पुन्हा ७-८ महिने पाण्याचा प्रश्न मिटला जातो.

**➤ नद्या देतील गावच्या आर्थिक विकासाला चालना**

परंतु प्रतिवर्षी पावसाळ्यात येणाऱ्या पुराच्या पाण्याचा योग्य साठा होण्यासाठी शासनाने प्रतीवर्षी गावोगावी नद्या -नाले, साफ सफाई, गाळ उपसा करून, आवश्यक तिथे पक्के बंधारे बांधले तर कोकणातील अशा अनेक गावातील पाणी समस्या कायमस्वरूपी दूर होईल आणि याच पाण्यावर बारमाही शेती देखील करणं सोपं होईल,निसर्गाने दिलेले दिलेले असे संकेत आता शासनानेही ओळखणे गरजेचे असून शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिल्यास गावातील ह्याच नद्या गावच्या आर्थिक विकासाला चालना देतील.

# ५ जुलैला राळेगणसिद्धितुन शिवपाणंद शेतरस्ता जनजागरण यात्रेचा शुभारंभ

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.३०, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्याची ओळख क्रांतीकारकांचा राष्ट्रभक्तांचा समाजसेवकांचा तालुका म्हणून असुन यासाठी तालुक्याने सामाजिक योगदानातुन राष्ट्रहिताच्या महत्त्वपूर्ण चळवळी उभारून देशसेवेचा धर्म निभावला आहे. त्याच ज्येष्ठ समाजसेवक आण्णासाहेब हजारे यांनी संपूर्ण आयुष्य समाजासाठी समर्पित केल असुन त्याच पारनेर तालुक्यात शेतरस्त्यांच्या ज्वलंत प्रश्नावर राळेगणसिद्धी नारायणगव्हाण शिवरस्त्यासाठी सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे यांनी प्रशासकीय न्यायालयीन जनजागृती आंदोलनाच्या माध्यमातून शेतरस्त्यांसाठी संघर्ष करणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी माझा रस्ता होवो न होवो जोपर्यंत माझ्या शेवटच्या भावाला दर्जेदार शेतरस्ता मिळत नाही तो पर्यंत थांबणार नाही असा संकल्प करून मला जो त्रास झाला तो इतरांना होवू नये म्हणून शेत तिथे रस्ता, गाव तिथे समृद्धीचा नारा देत राज्यभर चळवळ पोहचवली शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचा संघर्ष हा कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून, जाणीवपूर्वक शेतरस्ते अडवून शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या प्रवृत्तीविरोधात आणि प्रशासकीय यंत्रणेमधील त्रुटींमुळे शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आहे.एक शेतरस्ता बंद होतो तेव्हा फक्त रस्ता बंद होत नाही, तर एका शेतकरी कुटुंबाच्या आशा, स्वप्ने आणि भविष्याचा मार्ग अडवला जातो. अनेकदा अज्ञान, आर्थिक अडचणी, घरची प्रतिकूल परिस्थिती आणि न्याय मिळविण्याच्या मर्यादित साधनांमुळे शेतकरी हतबल होतो. शेतात जाण्याचा मार्ग बंद झाल्यानंतर होणारे आर्थिक नुकसान, वर्षानुवर्षे चालणारा संघर्ष आणि त्यातून मनात निर्माण होणारी असंख्य विचारांची वादळे संपूर्ण कुटुंबाला अस्वस्थ करून टाकतात.अनेक वेळा ही परिस्थिती इतकी गंभीर बनते की शेतकऱ्यांना जमिनी विकाव्या लागतात, नातेसंबंध तुटतात, वाद-विवाद वाढतात, भांडणे होतात आणि काही दुर्दैवी प्रसंगी हत्या, आत्महत्या यांसारख्या टोकाच्या घटना घडतात.

या वेदनादायी चक्रव्यूहातून बाहेर पडणे एका सामान्य शेतकरी कुटुंबासाठी अत्यंत कठीण ठरते. याच वेदनेतून शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचा जन्म झाला. संघर्षासोबतच न्याय देणारे हात निर्माण करण्याचा प्रयत्न आम्ही केला. ॲड. प्रतिक्षा काळे यांनी छत्रपती संभाजीनगर हायकोर्यात प्रभावी बाजू मांडत यशस्वी न्यायालयीन लढा दिला अर्ज केल्यानंतर ६० दिवसांत रस्ता शिव रस्ता निशुल्क हद्द निश्चितीसह खुला करण्याचे न्यायालयाचे आदेश महत्वपूर्ण राहिले सरकारसमोर सातत्याने पाठपुरावा करून नकाशांवरील रस्ते, प्रलंबित शेतरस्ता प्रकरणे आणि शेतकऱ्यांच्या अडचणी प्रभावीपणे मांडल्या. दुसऱ्या बाजूला, राज्यभरातील शेतकरी बांधवांना एकत्र करून त्यांच्या हक्कासाठी संघटित शक्ती उभी केली.आज शिव पाणंद चळवळ ही केवळ एक संघटना नसून हजारो शेतकरी कुटुंबांना आधार देणारे, न्यायाची आशा देणारे आणि संघर्षाला दिशा देणारे व्यासपीठ बनले प्रत्येक शेतकऱ्याला न्याय मिळालाच पाहिजे. हा न्याय देण्याचा अधिकार ज्या यंत्रणेकडे आहे, त्यातील अनेक कर्तव्यदक्ष अधिकारी आणि कर्मचारी यांनी आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून शेतकऱ्यांना न्याय दिला. परंतु काही ठिकाणी अन्यायही झाला, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

राज्य सरकारने नकाशावरील रस्त्यांच्या प्रश्नावर सकारात्मक पावले उचलली आहेत. त्यामुळे आगामी काळात अनेक प्रश्न मार्गी लागतील, अशी अपेक्षा आहे. मात्र शेतरस्त्यांचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी सातत्यपूर्ण, संयमी आणि सकारात्मक संघर्ष आवश्यक आहे.

म्हणूनच आपण मिशन झिरो पेण्डन्सी हा नारा दिला आहे.आपली ऊर्जा परस्पर वादात खर्च न करता ती शेवटच्या गरजू शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी वापरली पाहिजे. विविध माध्यमांतून हा ज्वलंत विषय जिवंत ठेवत, सकारात्मकतेने आणि एकजुटीने पुढे जात राहिलो तर नक्कीच यश आपल्या पायाशी असेल त्याचबरोब महत्वपूर्ण शासन राज्यात निघाले परंतु प्रशासकीय कार्यालयांकडून प्रत्यक्ष अंकलबजावनी होत नसल्यामुने रविवारी ५ जुलैला राळेगणसिद्धीतुन राज्यव्यापी शिव पाणंद शेतरस्ता जनजागरण यात्रा शुभारंभ व पदाधिकारी सन्मान अभियान जेष्ठ समाजसेवक आण्णासाहेब हजारे यांच्या हस्ते होणार आहे महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी प्रसार माध्यमांना बोलताना सांगितले.

> अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर न्यायालयाच्या आदेशासोबत शासन निर्णयाच्या अंमलबजासाठी शिव पाणंद शेतरस्ता चळवळीने केलेल्या पेरू वाटप आंदोलनाची दखल घेत जिल्हाधिकारी सिद्धराम सालिमठ यांनी महत्वपूर्ण शिवरस्ता निशुल्क मोजणीचे परिपत्रक काढून मोठे बळ दिले. अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा, श्रीगोंदा, श्रीरामपुर, संगमनेर, शेवगाव, पाथर्डी, राहाता, राहूरी तालुक्यासह छत्रपती संभाजीनगर, नाशिक, जळगाव, पुणे (ता.शिरूर, जुन्नर, आंबेगाव, दौंड) सातारा, कोल्हापूर, ठाणे आदिंसह विविध जिल्ह्यात तालुक्यान गावागावात फिरून पोहचवली प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतीला हक्काचा दर्जेदार सिमेंटचा रस्ता मिळून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.
>
> **- शरद पवळे (प्रणेते, महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळ)**

# शेती मशागतीची कामे पूर्ण; पेरणीची लगबग, मात्र पुरेशा पावसाची प्रतीक्षा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, पालम (परभणी) :** पालम तालुक्यात शेती मशागतीची बहुतांश कामे पूर्ण झाली असून शेतकरी पेरणीसाठी सज्ज झाले आहेत. मात्र, तालुक्यात अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने पेरणीला अपेक्षित वेग आलेला नाही. काही दिवसांपूर्वी पावसाने हजेरी लावली असली, तरी तो पेरणीयोग्य नसल्याने शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. परिसरातील शेतकऱ्यांनी नांगरणी, वखरणी तसेच इतर मशागतीची कामे पूर्ण केली आहेत. पेरणीसाठी आवश्यक असलेल्या कापूस,




सोयाबीन, तूर, मूग आदी पिकांच्या बियाण्यांच्या खरेदीसाठी पालम येथील मोंढा परिसरात शेतकऱ्यांची मोठी गर्दी होत आहे.

अनेक शेतकऱ्यांनी बी-बियाणे व खते खरेदी करून ठेवली असून, आता केवळ चांगल्या पावसाची प्रतीक्षा सुरू आहे. यंदाच्या खरीप हंगामाची सुरुवात समाधानकारक व्हावी, पिकांची वेळेत पेरणी व्हावी आणि भरघोस उत्पादन मिळावे, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. पुरेसा व सलग पाऊस झाल्यानंतरच तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पेरणीला वेग येण्याची शक्यता आहे.

## थोडक्यात

# दिवा, मुंब्रा, कळवा, ठाणे, नवी मुंबई, अंबरनाथ, डोंबिवली, कल्याण भागात ४८ तास पाणीपुरवठा बंद

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३०, दिवा (ठाणे) :** सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बारवी जलशुद्धीकरण केंद्रातून होणारा पाणीपुरवठा गुरुवार आणि शुक्रवार असे दोन दिवस पूर्णपणे बंद राहणार आहे.

**कालावधी :** गुरुवार, दि.२ जुलै २०२६ सकाळपासून ते शुक्रवार, दि.३ जुलै २०२६ रात्री १२:०० वाजेपर्यंत - एकूण ४८ तास

**बाधित क्षेत्र :-** दिवा, मुंब्रा, कळवा, ठाणे, नवी मुंबई, अंबरनाथ, डोंबिवली, कल्याण आणि बारवी धरणावरून पाणीपुरवठा होणारा संपूर्ण परिसर.

कारण :- अलनिनो व आयओडीच्या प्रभावामुळे पावसाळा लांबण्याची शक्यता असल्याने पाणी टंचाई टाळण्यासाठी खबरदारी म्हणून पाणी कपात करण्यात येत आहे.

**नागरिकांनी तातडीने दक्षता घ्यावी :-**

१) गुरुवार-शुक्रवार दोन दिवस पाणी येणार नाही. पुरेसा पाणीसाठा करून ठेवावा.

२) पाण्याचा अत्यंत जपून व काटकसरीने वापर करावा.

३) शनिवारपासून पाणीपुरवठा सुरू झाल्यावर सुरुवातीचे काही तास कमी दाबाने पाणी येईल. अशी सूचना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दिली आहे.

# रात्रीचे भारनियमन रद्द करा - सुजित झावरे पाटील

## अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील ग्रामीण भागात महावितरणकडून सुरू असलेल्या रात्रीच्या भारनियमन हे ग्रामस्थांच्या सुरक्षिततेशी, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि शेतकऱ्यांच्या हिताशी थेट खेळणारे आहे. अशा परिस्थितीत रात्री गाव अंधारात ठेवणे हे अत्यंत गंभीर असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. महावितरणने तात्काळ भारनियमन रद्द करावे. अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांनी दिला. दिनांक २९ जून २०२६ रोजी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांची भेट घेऊन ग्रामीण भागातील वीजपुरवठा तातडीने सुरळीत करण्याची मागणी केली. यावेळी कार्यकारी अभियंत्यांनी दोन दिवसांत वीज प्रश्न पूर्ववत करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती झावरे पाटील यांनी दिली.

झावरे म्हणाले की, यापूर्वी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत भारनियमन होत होते. मात्र आता अनेक गावांमध्ये थेट रात्री १ वाजेपर्यंत वीजपुरवठा खंडित ठेवला जात आहे. त्यामुळे नागरिकांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागत असून लहान मुले, वृद्ध, महिला तसेच शेतकऱ्यांचे मोठे हाल होत आहेत. विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही याचा विपरीत परिणाम होत आहे. रात्रीच्या अंधारामुळे ग्रामीण भागात सुरक्षेचा ही प्रश्न निर्माण झाला असून चोरीच्या घटना वाढण्याची तसेच विषारी प्राण्यांचा धोका निर्माण होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे रात्रीचे भारनियमन तात्काळ बंद करून नियमित वीजपुरवठा सुरू करावा, अशी मागणी झावरे पाटील यांनी केली. या विषयाची गांभीर्याने दखल घेत कार्यकारी अभियंत्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन दोन दिवसांत परिस्थिती सुधारण्याचे आश्वासन दिले. मात्र दिलेल्या मुदतीत वीजपुरवठा पूर्ववत झाला नाही, तर जनतेच्या हितासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही सुजित झावरे पाटील यांनी महावितरण प्रशासनाला दिला.

# खापरखेडा व परिसरातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शाळा प्रवेशोत्सवाने जल्लोषात स्वागत




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३०, नागपूर :** 'स्कूल चले हम' चा नवा उत्साह आणि चेहऱ्यावर नवा आनंद घेत आजपासून नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली. खापरखेडा, भानेगाव, सिल्लेवाडा, वलनी, दहेगाव रंगारी, पिपळा डाकबंगला परिसरातील विविध शाळांमध्ये ३० जून रोजी पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात, तर कुठे पुष्प आणि खाऊ देऊन अत्यंत उत्साहवर्धक वातावरणात जोरदार स्वागत करण्यात आले. यामुळे बऱ्याच दिवसांनी गजबजलेल्या शाळांमध्ये पहिल्याच दिवशी शाळा प्रवेशोत्सवाचा अभूतपूर्व सोहळा पाहायला मिळाला. दीर्घ सुट्ट्यांनंतर शाळेत पाऊल ठेवणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याचा पहिला दिवस संस्मरणीय ठरावा यासाठी शाळा प्रशासनाने जय्यत तयारी केली होती. खापरखेडा व परिसरातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे पुष्प, पुस्तक, पेन्सिल आणि खाऊ देऊन स्वागत करण्यात आले.

नवीन वर्गात जातानाचा विद्यार्थ्यांचा आनंद आणि शिक्षकांचा जिव्हाळा यामुळे संपूर्ण परिसरातील वातावरण चैतन्यमय झाले होते.परिसरातील अनेक नामांकित शाळांमध्ये हा स्वागत सोहळा मोठ्या थाटात पार पडला, ज्यात प्रामुख्याने शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खापरखेडामहाराष्ट्र विद्यालय खापरखेडा, जि.प.प्राथमिक उच्च शाळा खापरखेडा, शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कूल खापरखेडा,डी.एव्ही प्राथमिक शाळा खापरखेडा, स्व. फुलचंद जैन मतिमंद शाळा, खापरखेडा, रणछोडदास जि.प.शाळा खापरखेडा, जि. प. उच्च प्राथमिक शाळा भानेगाव, जि.प. उच्च प्राथमिक शाळा चनकापूर, महाराष्ट्र विद्यालय सिल्लेवाडा, वलनी हायस्कूल वलनी, जि.प.उच्च प्राथमिक शाळा दहेगावं (रंगारी), जि.प.उच्च प्राथमिक शाळा पिपळा (डाकबंगला) या सर्व शाळांमध्ये पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

शाळा प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित विशेष कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. केवळ पुस्तकी ज्ञान न घेता नियमित शिक्षण, दर्जेदार गुणवत्ता आणि पर्यावरण संवर्धन या त्रिसूत्रीचे पालन करण्याचा संदेश या वेळी विद्यार्थ्यांना देण्यात आला. एक सजग नागरिक म्हणून घडताना निसर्गाचे रक्षण करणे किती गरजेचे आहे, याचेही बाळकडू पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मिळाले.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले खाऊचा गोड आस्वाद घेत आणि नव्या दप्तराचे ओझे विसरत विद्यार्थ्यांनी हसत-खेळत पहिल्या दिवसाचा आनंद लुटला. या सोहळ्याला विविध शाळांचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.